सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण**
एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर आळी, पोलीस स्कुल समोर ठाणे पश्चिम-४००६०१,
E-MAIL ID – lcb.thane.r@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२५३४३५६७

---

**प्रेस नोट क्र. ११** **दिनांक :- २१/०३/२०२४**

# ठाणे ग्रामीण कार्यक्षेत्रात लोकसभा निवडणुक २०२४ चे पार्श्वभुमीवर मुरबाड पोलीस स्टेशनच्या हद्दीत केंद्रिय औदयौगिक सुरक्षा दला (CISF) कडुन रुट मार्च

आगामी लोकसभा निवडणुक- २०२४ चे अनुषंगाने ठाणे ग्रामीण जिल्हयातील मुरबाड पोलीस ठाण्याचे हद्दीत दिनांक १८/०३/२०२४ व दिनांक १९/०३/२०२४ रोजी मा. डॉ. डी. एस. स्वामी पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण तसेच डॉ. दिपाली धाटे, अपर पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण तसेच श्री जगदिश शिंदे उपविभागीय पोलीस अधिकारी मुरबाड विभाग, मुरबाड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. प्रमोद बाबर, पोलीस निरीक्षक, मुरबाड पोलीस ठाणे यांनी मुरबाड पोलीस ठाणेचे हद्दीत तिन हात नाका-बाजार पेठ- मुरबाड बस स्टॅंड-राम मंदीर-उगले आळी-माळीपाडा-देवगाव-कुडवली-देवपे तसेच सरळगांव, म्हासा देहरी गावामध्ये केंद्रिय औदयौगिक सुरक्षा दला (CISF) व मुरबाड पोलीस स्टेशनचे अधिकारी व अमंलदार यांचे समावेत रुट मार्च घेण्यात आलेला आहे. सदर रुट मार्च मध्ये मुरबाड पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी, ०२ अधिकारी, १२ पोलीस अंमलदार तसेच केंद्रिय औदयौगिक सुरक्षा दलाचे (CISF) एकुण ४५ जवान सहभागी झाले होते.

**************************************************************************